महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमीअभिलेख (म.राज्य) , पुणे
दूसरा व तिसरा मजला , नवीन प्रशासकीय इमारत , विधानभवनसमोर , कॅम्प , पुणे

**दूरध्वनीक्र. ०२०-२६१३७११०** Web site: https://mahabhumi.gov.in

---

दि.२३/१/२०२४

# - प्रसिध्दीपत्रक -

**विषय :- महसूल विभागातील गट - क संवर्गातील तलाठी भरती सन २०२३ निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करणे बाबत.(२३ जिल्हे)**

विषयात नमूद केले नूसार महाराष्ट्र राज्यातील महसूल विभागातील तलाठी (गट-क) संवर्गाचे सरळसेवा पदभरती २०२३ मधील गुणवत्ता यादी प्रसिध्दी करणेत आली आहे. भरतीचा पुढील टप्पा हा निवडयादया व प्रतिक्षायादया तयार करणेचा आहे. सोबत पेसा क्षेत्र नसलेल्या २३ जिल्हयातील तलाठी पदासाठी शिफारस केलेल्या उमेदवारांच्या निवडयादया व प्रतिक्षा यादया प्रसिध्द करणेत येत आहे. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. प्रानिमं१२२२/प्र.क्र५४/का.१३-अ दि.४/५/२०२२ प्रमाणे प्रत्येक जिल्हयात नियुक्त करावयाच्या उमेदवारांची निवडयादी तसेच प्रतिक्षा यादी ही संबंधित जिल्हयाच्या जिल्हा निवड समितीने तयार केलेली आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयात अनुसूचित क्षेत्रातील (पेसा कायदा लागू) १७ संवर्गातील सरळसेवा पदभरती अनुषंगाने दाखल याचिका क्र. Petition For Special Leave To Appeal (c) No २२१०९/२०२३ मधील निर्णयास अधिन राहून अनूसूचित क्षेत्र (पेसा कायदा लागू) असलेल्या १३ जिल्हयांची निवडयादी तयार करण्याचे काम संबंधित जिल्हयांच्या जिल्हा निवड समित्यांमार्फत सामान्य प्रशासन विभागाचे पुढील निर्देशानंतर करणेत येईल. त्यामुळे निवडयादी व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या जिल्हयांची नावे खालील प्रमाणे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. रायगड | ५. मुंबई उपनगर | ९. कोल्हापूर | १३. परभणी | १७. वर्धा | २१.छ.संभाजी नगर |
| २. रत्नागिरी | ६. सातारा | १०.अकोला | १४. बीड | १८. नागपूर | २२. धाराशिव |
| ३. सिंधुदुर्ग | ७. सांगली | ११. बुलढाणा | १५. लातूर | १९. गोंदिया | २३.हिंगोली |
| ४. मुंबई शहर | ८.सोलापूर | १२. वाशिम | १६. जालना | २०. भंडारा | |

निवडयादी व प्रतिक्षा यादी प्रसिध्दीनंतर उमेदवाराची ओळख, प्रमाणपत्रे व संबंधित कागदपत्रे पडताळणी, वैद्यकीय तपासणी, चारित्र्य पडताळणी याचप्रमाणे समांतर आरक्षणाप्रमाणे कागदपत्रांची पडताळणी ही अंतिम नियुक्तीपुर्वीची कार्यवाही संबंधित जिल्हा निवड समितीकडून जिल्हास्तरावर करणेत येईल. जिल्हास्तरावरील कार्यवाही बाबतचे वेळापत्रक हे संबंधित जिल्हयांच्या शासकीय संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.

स्वाक्षरी /- XXX
**(सरिता नरके )**
**प्रभारी राज्य परीक्षा समन्वयक तथा**
**अपर जमाबंदी आयुक्त, आणि अतिरिक्त संचालक**
**भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे**